जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2017
सकाळ

# प्रकाश जावडेकर उद्या कोल्हापुरात

कोल्हापूर, ता. १५ : केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत नॅचरल प्रोडक्टस् केंद्राचे सोमवारी (ता. १७) डिजिटल लाँचिंग करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी दहा वाजता कार्यक्रमास सुरवात होईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमास खासदार धनंजय महाडिक, खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती, महाराष्ट्र शासनाच्या सचिव मीता राजीवलोचन (IAS) उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 APR 2017
पुढारी

# ना. जावडेकर यांच्या हस्ते उद्या डिजिटल लॉन्चिंग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १७) शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत नॅचरल प्रोडक्टस् केंद्राचे डिजिटल लॉन्चिंग सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. याबाबतच्या तयारीची प्रशासनाची आज बैठक झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमास खासदार धनंजय महाडिक, खासदार संभाजीराजे छत्रपती, राज्य सरकारच्या सचिव मीता राजीवलोचन उपस्थित राहणार आहेत.

देशभरातील विविध 'रुसा' केंद्रांचे लॉन्चिंग केंद्रीय मंत्री जावडेकर यांच्या हस्ते नवी दिल्ली येथून डिजिटल पद्धतीने होणार आहे.